


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक ८६, रविवार २३ फेब्रुवारी २०२५ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# नगर जिल्ह्याचा बिहार झालाय !

## अतिक्रमण मोहिमेविरोधात खा. नीलेश लंके यांचा संताप



अहिल्यानगर : प्रतिनिधी

**गुंडगिरी पध्दतीने पोलीस व महसूल प्रशासनाचा गैरवापर करून कोणत्याही प्रकारची नोटीस न देता नागरीकांच्या मालमत्ता जमीनदोस्त करण्याचे काम सत्ताधाऱ्यांकडून करण्यात येत असल्याचे सांगत नगर जिल्हयाचा बिहार झाल्याचा गंभीर आरोप करीत खासदार नीलेश लंके यांनी संताप व्यक्त केला.**

गुंडगिरी पध्दतीने, पोलीस, महसूल प्रशासनाचा वापर करून कोणतीही नोटीस न देता सकाळी सात वाजता बुऱ्हानगर येथील अभिषेक भगत यांचे अडीच ते तीन कोटी रूपयांचे मंगल कार्यालय उध्वस्त करण्यात आले त्यानंतर खा. नीलेश लंके यांनी शनिवारी दुपारी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेउन राजकीय आकसातून अशी कारवाई करणाऱ्या अधिकारी-कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली. त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

खा. लंके म्हणाले, जिल्हयातील नागरीकांचे म्हणणे ऐकूण न घेता आकसापोटी त्यांचे अतिक्रमण सिध्द करून ते पाडण्याचा कट जिल्हयात गेल्या अनेक दिवसांपासून रचण्यात येत आहे. जो माणूस कायद्याच्या चौकटीत काम करतो, उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालयात काम करणारे अभिषेक भगत हे बुऱ्हानगर येथील देवीचे भक्त आहेत. तिथे त्यांचा स्वत:चाचे आउट असताना, सर्व कर भरण्यात आलेले असताना तसेच त्यांनी त्यांच्या जागेतून ग्रामस्थांसाठी रस्तेही काढून देण्यात आलेले आहेत असे असताना सकाळी गुंडाराज पध्दतीने शंभर दिडशे पोलीस तसेच काही गुंड प्रवृत्तीचे लोकही तोंड बांधून त्या ठिकाणी आले. व सर्व जमीनदोस्त करण्यात आल्याचे लंके यांनी सांगितले.

### विरोधकांना टार्गेट केले जात आहे

ज्यांनी विधानसभा, लोकसभा निवडणूकीत सत्ताधा-यांचे काम केले नाही अशा लोकांना ठरवून टार्गेट केले जात आहे. त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकूण न घेता त्यास त्रास दिला जात आहे. त्यांचे राहते घर, व्यवसायाचे ठिकाण जमीनदोस्त करण्याचे प्रकार सुरू आहेत. हे प्रकार थांबले नाहीत तर आम्हाला ठोस पाउले उचलावी लागणार आहेत. वेगळया पध्दतीने समाजाला वेठीस धरले जाणार असेल तर त्यांना धडा शिकविण्याची ताकद आमच्यात आहे. महाविकास आघाडीचे कार्यकर्ते एकत्र येऊन या गोष्टीला प्रखर विरोध करतील.

खासदार नीलेश लंके
लोकसभा सदस्य

### पालखीची मोडतोड

एकीकडे आम्ही हिंदुत्वाचे काम करतो हे सांगायचे आणि दुसरीकडे २१०० वर्षांपूर्वीच्या पालखीची तोडफोड करायची असा सत्तेचा गैरवापर करण्यात येत असून त्यासंदर्भात आपण जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेवून तक्रार केल्याचे खा. लंके यांनी सांगितले.

### तर आयुक्तांना पळता भुई थोडी होईल !

महानगरपालिकेतील कारनामे बाहेर काढले तर आयुक्तांना पळता भुई थोडी होईल. महापालिका व महसूल प्रशासनाने चुकीच्या पध्दतीने कारवाई करू नये. अधिका-यांना फोन केल्यावर ते आमच्यावर दबाव असल्याचे सांगतात. अधिकाऱ्यांवर दबाव आहे म्हणून तुम्ही लोकांना उध्वस्त करणार का ? असा सवाल लंके यांनी केला.

### जल जीवन मिशनमध्ये मोठा घोटाळा

ठराविक अधिकाऱ्याला एखाद्या पदावर बसविण्याचा घाट घातला जातो कारण त्यामागे आर्थिक हितसबंध असतात. जल जीवन मिशनच्या कामातील भ्रष्टाचारावर आपण आवाज उठविला आहे. त्याचे माझ्याकडे सर्व पुरावे आहेत. त्यासंदर्भात केंद्रीय मंत्रयांची भेट घेउन भ्रष्टाराचे पुरावे, व्हिडीओ सादर केले आहेत. आएएस दर्जाच्या अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली केंद्रीय समितीमार्फत चौकशी करण्याची आपण मागणी केली आहे. हा नगर जिल्हयातील घोटाळा नसून राज्यातील सर्वात मोठा घोटाळा आहे. एखादी पाणी योजना झाल्यानंतर पुन्हा तीस वर्षे पाणी योजनेसाठी निधी मंजुर होत नाही. कागदोपत्री किंवा निकृष्ट दर्जाच्या या योजना होणार असतील, अर्धा फुटांवर पाईप गाडले जाणार असतील, ज्या कंपनीचे पाईप घेण्यासाठी मान्यता नाही त्या कंपनीचे पाईप टाकले जाणार असतील, योजना पुर्णत्वास जाणार नसेल तर हे सर्व काही चुकीचे आहे.

### वडगांव गुप्ता येथे आदिवासींच्या झोपड्या उध्वस्त

वडगांव गुप्ता येथे आदिवासी भिल्ल समाजाचे कुटूंब ५० वर्षांपासून वास्तव्यास आहे. कायद्याचा दुरउपयोग करून या आदीवासी बांधवांच्या झोपडया जमीनदोस्त करण्यात आल्याचक लंके यांनी सांगितले.

### दोषींवर कारवाई झाली पाहिजे

नगर शहरातही महापालिका आयुक्तांकडून चुकीच्या कारवाया करण्यात येत आहेत. लोकांकडे उतारे असतानाही त्यांचे म्हणणे एकूण न घेता गाळे जमीनदोस्त करण्यात आले. ज्या अधिकाऱ्यांनी राजकीय अकासापोटी या कारवाया केल्या आहेत त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे अशी मागणी खा. लंके यांनी केली.

### एक दिवस किंमत मोजावी लागेल

हे सर्व थांबले पाहिजे. राजकारण सुरू राहील. सत्ता आज ना उद्या येईल. अधिकाऱ्यांनी सत्ताधारी व विरोधकांमध्ये समतोल ठेवला पाहिजे. लोकांचे आयुष्य उध्वस्त करून तुम्हाला काही भेटणार नाही. एक दिवस त्याची किंमत मोजावी लागेल असे खा. लंके यांनी सांगितले.

### टेंडर भरणारांना दमदाटी

महानगरपलिकेमध्ये स्क्रॅपचे टेंडर होते. त्या ठिकाणी काही गुंड प्रवृतीचे लोक बसवून ठेवले. कोणी टेंडर भरण्यासाठी आले तर त्यास दमबाजी करून तिथून काढून देण्यात आले. शेवटी मी माझया कार्यालयातील माणसाला महानगरपालिकेत पाठवउन काही लोकांना टेंडर भरण्यास भाग पाडल्याचे खा. लंके यांनी सांगितले.

### कागदोपत्री घोडे नाचविले जाताहेत !

दिशा समितीच्या बैठकीत अधिकाऱ्यांकडे किती गावांमधील जल जीवन मिशनची कामे पुर्णत्वास गेली आहेत अशी विचारणा करण्यात आली असता त्यांनी २१० गावांमध्ये या योजनेचे काम पुर्ण झाल्याचे सांगितले. प्रत्यक्ष चौकशी करण्यात आली असता ५० गावांमध्येही या योजनेचे काम पुर्ण झालेले नाही. फक्त कागदोपत्री घोडे नाचविण्याचे काम केले जात आहे. २५ टक्के काम करून ७० टक्के कामाचे बिल काढण्यात येत आहे. जुन्या खडडयावर रिंग टाकून विहीरीचे बिल काढण्यात येत आहे. अधिकारी व ठेकेदार मिळून जल जीवन मिशनचा घोटाळा करण्यात येत आहे. याच कारणामुळे एका अधिकाऱ्याचे निलंबनही झालेले आहे.

खासदार नीलेश लंके , लोकसभा सदस्य

# जिल्ह्यातील दहशतीची किड नष्ट केली!

## । आ. काशिनाथ दाते यांचे खा. लंके यांच्यावर टीकास्त्र । देवीभोयरे येथे नागरी सत्कार

देवीभोयरे : प्रतिनिधी

**खासदारकीच्या माध्यमातून नगर जिल्हयात दहशतीची किड पसरली होती. पारनेर-नगर मतदारसंघातील सुज्ञ मतदारांनी ही किड नष्ट करण्याचे काम केल्याने जिल्हा शांत झाल्याचे सांगत आमदार काशिनाथ दाते यांनी खासदार नीलेश लंके यांचे नाव न घेता टीकास्त्र सोडले.**



■ विधानसभा निवडणूकीत विजय संपादन केल्याबददल आमदार काशिनाथ दाते यांचा देवीभोयरे ग्रामस्थांच्या वतीने सपत्नीक नागरी सत्कार करण्यात आला.

देवीभोयरे ग्रामस्थांच्या वतीने विधानसभा निवडणूकीत विजय संपादन केल्याबद्दल आ. दाते यांचा नागरी सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना आ. दाते हे बोलत होते. डॉ.भाऊसाहेब खिलारी हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. देवीभोयरेचे मा. उपसरपंच विकास सावंत व त्यांच्या सहका-यांनी केलेली नवसपुत अंबिका देवीच्या मंदीरात दाते यांची गुळ तुला करू करण्यात आली.

आ. दाते म्हणाले, जनतेने आपल्यावर विश्वास टाकला असून त्यास तडा न जाऊ देता विकास कामे मोठया प्रमाणावर माग लावण्यात येतील. गेली पाच वर्षे तालुका दहशतीलखाली होता. गेली चाळीस वर्षे आपण सामाजिक काम केले. त्यावर विश्वास ठेउन जनतेने दहशत मोडून काढीत मला संधी दिली. आता तालुक्यातील पाट पाण्याचे प्रश्न सोडविण्यासाठी आपण प्राधान्य देणार आहोत. विधानसभेमध्ये लक्षवेधी सुचनेद्वारे विविध सुचना करण्यात आल्यानंतर त्याची दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली असून मतदारसंघाचे प्रश्न तातडीने माग लागणार आहेत. कुकडी डावा कालवा व पिंपळगांवजोगा कालवा अस्तरीकरणाचा प्रश्न माग लागला आहे. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांनी प्रत्यक्ष पाहणी करून या कामासाठी निधी मंजुर केल्याने हे काम लवकरच सुरू होणार असल्याचे दाते म्हणाले.

डॉ. भाउसाहेब खिलारी यांनी आ. दाते यांच्या कामाचा गौरव करत तालुका विकासाला गती येणार असल्याचे सांगितले. मा. सरपंच बाबूराव मुळे, विश्वनाथ गाजरे यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी विकास कामांची माहीती देत आ. दाते हे विकास पुरूष असून देवीभोयरेच्या विकासासाठी आ.दाते, विश्वनाथ कोरडे, राहुल शिंदे पाटील ही त्रिमुर्ती विकासाचे शिल्पकार ठरतील असा विश्वास व्यक्त केला. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच शिक्षक सुभाष मगर यांचा पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. अमोल गजरे यांनी सुत्रसंचलन तर विकास सावंत यांनी आभार मानले.

यावेळी भाजपाच्या राज्य कार्यकारणीचे सदस्य विश्वनाथ कोरडे, तालुकाध्यक्ष राहुल पाटील शिंदे, मा. नगराध्यक्ष विजय औटी, राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष रखमाजी कापसे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, युवा तालुकाध्यक्ष भास्कर उचाळे, दिलीप दाते, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस सुभाष दुधाडे, भाजपाच्या सांस्कृतीक सेलचे तालुकाध्यक्ष विलास हारदे यांच्यासह ग्रामस्थ यावेळी मोठया संख्येने उपस्थित होते. उर्वरीत पान ३ वर

### इतरांना शक्य झाले नाही ते आ. दाते यांनी केले

कुकडी कालव्याचे आवर्तन गुरूवार दि.२० फेब्रुवारी रोजी सुटणार होते. मात्र आ. काशिनाथ दाते यांनी पाठपुरावा करून हे आवर्तन दि.१६ रोजी सोडण्यासाठी जलसंपदा मंत्री यांना साकडे घातले. आजपर्यंत कोणत्याही लोकप्रतिनिधीला जे शक्य झाले नाही ते काम काशिनाथ दाते यांनी करून दाखविले आहे. केंद्र आणि राज्य सरकार आपले आहे. राज्याचे जलसंपदा मंत्रीपद राधाकृष्ण विखे यांच्याकडे आहे. त्याचा फायदा पारनेर तालुक्याला होत असल्याचे भाजपाचे तालुकाध्यक्ष राहुल पाटील शिंदे यांनी सांगितले.

### खासदारांच्या फेक न्युज !

नगरचे खासदार पुणे जिल्ह्यातील कामांची माहीती देत फेक न्युज देत आहेत. गेल्या पाच वर्षात फेक काम करण्याचे काम त्यांनी केले. त्यामुळे जनतेने चांगला निर्णय घेऊन त्यांना थांबविण्याचे काम केले. आता तालुका शांत झालाच आहे. परंतू जिल्हाही शांत झाला आहे. आता विकासाला खऱ्या अर्थाने गती येणार असून आगामी निवडणूकांमध्ये जनतेने महायुतीसोबत रहावे.

राहुल शिंदे पाटील, भाजपा तालुकाध्यक्ष

### विकास कामे मार्गी लागणार !

आ. काशिनाथ दाते हे कार्यक्षम नेतृत्व मतदारसंघाला मिळाले आहे. त्याचा फायदा मतदारसंघाला मोठया प्रमाणावर होणार आहे. महायुतीच्या माध्यमातून येत्या पाच वर्षात तालुक्यात मोठया प्रमाणावर विकास कामे माग लागणार आहेत. आगामी ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूकीत जनतेने महायुतीसोबत रहावे.

विश्वनाथ कोरडे, राज्य कार्यकारणी सदस्य, भाजपा

### विकास कामे मार्गी लागणार !

आ. काशिनाथ दाते हे कार्यक्षम नेतृत्व मतदारसंघाला मिळाले आहे. त्याचा फायदा मतदारसंघाला मोठया प्रमाणावर होणार आहे. महायुतीच्या माध्यमातून येत्या पाच वर्षात तालुक्यात मोठया प्रमाणावर विकास कामे माग लागणार आहेत. आगामी ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूकीत जनतेने महायुतीसोबत रहावे.

विश्वनाथ कोरडे, राज्य कार्यकारणी सदस्य, भाजपा

# गायत्रीताई हे अती होतंय !

## तहसिल कार्यालयातील अनागोंदीवर मनसे आक्रमक
## पारनेरच्या जनतेला वेठीस धरू नका : अविनाश पवार

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेरच्या तहसिल कार्यालयात सर्वसामान्यांची रस्ता केस असो व इतर कोणतेही काम असो, सामान्यांची तिथे अवहेलना होत असून सर्वसामान्यांना गृहीत धरून महसूल कर्मचारी उडवाउडवीची उत्तरे देत आहे. सामान्यांना तहसिल कार्यालयात वारंवार हेलपाटे मारावे लागतात हे दुर्देव असल्याचे सांगत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या माथाडी कामगार सेनेचे राज्य उपाध्यक्ष अविनाश पवार यांनी तहसिलदार गायत्रीताई सैंदाणे हे अती होतंय असा इशारा दिला आहे.**

तालुक्यातील विविध विभागांच्या कार्यालयांमध्ये अधिकारी व कर्मचारी नागरीकांना वेठीस धरत असून तालुक्यातील राजकीय आराजकतेचा अधिकारी व कर्मचारी गैरफायदा घेत आहेत. शेतकरी, शालेय विद्यार्थ्यांसह नागरीकांच्या अनेक तक्रारी



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडे प्राप्त झाल्यानंतर रितसर पत्र देऊन आज ना उद्या कामे होतील अशी अपेक्षा होती. मात्र दोन-अडीच वर्षे पुर्ण होउनही तहसिल कार्यालयाच्या कामकाजात काहीही सुधारणा झालेली नाही. एक महिला अधिकारी म्हणून आम्ही सन्मान देत संयमाने वागतो आहोत उर्वरीत पान ३ वर

### कर्मचाऱ्यांची उडवाउडवीची उत्तरे

तहसिल कार्यालयातील कर्मचारी नागरीकांना उडवाउडवीची उत्तरे देतात. कर्मचारी उपस्थित असतानाही आज साहेब आले नाहीत, बाहेर गेले आहेत अशी उत्तरे स्वतः कर्मचारीच देतात हे घृणास्पद आहे. कर्मचाऱ्यांनी गळयामध्ये ओळखपत्र घालणे अनिवार्य असताना तसे केले जात नाही. सामान्यांना किरकोळ कारणासाठी हेलपाटे मारण्यास भाग पाडले जाते. रेशनकार्डमध्ये नाव समाविष्ट करणे, दुबार नोंदणी, ऑनलाईन करण्यासाठी, विभक्त करण्यासाठी, नवीन रेशनकार्डसाठी नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

### सेतू केंद्रात लुट

सेतू केंद्राच्या माध्यमातून नागरीकांची, विद्यार्थ्यांनी खुलेआम लुट करण्यात येत आहे. त्यासंदर्भात पत्रव्यवहार करूनही सेतू चालकांवर कोणतीही कार्यवाही करण्यात येत नाही. सेतू केंद्रांच्या नावे बोगस सेतू केंद्र स्थापण्यात आली आहेत. सेतू केंद्रात माहितीची सनद लावणे बंधनकारक असताना त्याची अंमलबजावणी होत नाही. अव्वाच्या सव्वा पैस उकळून गोगरीबांना लुटलं जात असल्याचा आरोप पवारांनी केला.

# सुरेश धसांना आता परळीतूनही विरोध

## । काळे झेंडे दाखवत केली जोरदार घोषणाबाजी । गुंड असल्याचा आरोप

परळी : प्रतिनिधी

**बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात राज्यभरात आंदोलनाच्या माध्यमातून रान पेटवणारे भाजप आमदार सुरेश धस यांना आता परळी तालुक्यामधूनच विरोध होताना दिसत आहे. संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख आणि महादेव मुंडे यांच्या कुटुंब यांच्या भेटीसाठी सुरेश धस परळी मध्ये दाखल झाले होते. मात्र या दरम्यान सुरेश धस यांना तेथील नागरिकांनी काळे झेंडे दाखवत त्यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. सुरेश धस यांनी परळीची बदनामी केली असून**



**ते स्वत:च गुंड असल्याचा आरोप या आंदोलकांनी केला आहे.**

संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाचा तपास अंतिम टप्प्यात आहे. यातील फरार आरोपी कृष्णा आंधळेला अटक होणे गरजेचे असून त्यांना फरार करणाऱ्यांवरही कारवाई झाली पाहिजे. ग्रामस्थांच्या आठ मागण्या मान्य झाल्या तर त्यांना आंदोलन करण्याची वेळ येणार नाही, असे भाजप आमदार सुरेश धस यांनी म्हटले आहे. पंकज कुमावत

उर्वरीत पान ३ वर



स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती

# शिवार



**उन्हाळयात फळबागांमध्ये सूक्ष्म सिंचन पद्धती, आच्छादन, बाष्परोधकांचा वापर करणे आवश्यक आहे. जेणेकरून वाढत्या तापमानाचा विपरित परिणाम फळझाडांवर होणार नाही. सध्या कमाल आणि किमान तापमानात चांगलीच वाढ होण्यास सुरुवात झाली आहे. सकाळी व सायंकाळी थोडा गारवा तर दिवसा सर्वसाधारण ३५ ते ३८ अंश सेल्सिअसपर्यंत तापमान अशी स्थिती पाहायला मिळते आहे. मागील पावसाळ्यात राज्यातील बहुतांशी भागांत कमी पाऊस झाल्याने सिंचनाचे स्त्रोत खालावले आहेत. त्याचा परिणाम फळबागांवर होत आहे.**

सूर्यप्रकाश, उष्ण वारे, कोरडी हवा यांचा विपरीत परिणाम नवीन लागवड केलेल्या फळझाडांवर तसेच फळे देणाऱ्या झाडांवर होत होतो. यामुळे मुख्यत्वे कोवळी फूट करपणे, खोड तडकणे, फळगळ होणे, फळांचा आकार लहान होणे तसेच पाने, फळे गळून झाडे वाळून जाणे, झाडांची वाढ थांबणे आणि शेवटी झाड मरणे असे प्रकार होतात. त्यामुळे फळबागांचे मोठे नुकसान होते. याकरिता पाण्याचा आणि उपलब्ध संसाधनांचा कार्यक्षम वापर होऊन उन्हापासून फळबागांचे संरक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे.

# उन्हाळयात फळबागांची काळजी

- लहान रोपांना सावली करणे : कडक उन्हापासून नवीन लागवड केलेल्या फळझाडांच्या रोपांचे संरक्षण करण्यासाठी पहिली १ ते २ वर्षे रोपांवर सावली करावी. त्यासाठी रोपाच्या दोन्ही बाजूंना ३ फूट लांबीचे बांबू रोवावेत. या बाबूंना चारही बाजूंनी व मधून तिरकस असे बांबू किंवा कामट्या बांधून त्यावर वाळलेले गवत अंथरावे. या गवतावरून तिरकस काड्या सुतळीने व्यवस्थित बांध्याव्यात. वाळलेल्या गवता ऐवजी बारदाना किंवा शेडनेटचा वापर करावा.
- वारा प्रतिरोधकाचा किंवा कुंपणाचा वापर : बागेभोवती अगदी सुरुवातीलाच शेवरी, मलबेरी, चिलार, विलायती चिंच, सुबाभूळ, ग्लिरिसिडीया, सुरू, शेर, निवडुंग यापैकी उपलब्ध वनस्पतींची सजीव कुंपण म्हणून लागवड करावी. त्यामुळे फळबागेचे उष्ण वाऱ्यांपासून संरक्षण होते. बाष्पीभवनाचा वेग कमी होतो.
- खतांची फवारणी : उन्हाळी हंगामात बाष्पीभवन व पर्णोत्सर्जनाचा वेग जास्त असल्यामुळे फळझाडांची पाने कोमजतात. पानांतील पाण्याचे प्रमाण कमी होऊन अन्ननिर्मिती प्रक्रिया मंदावते. अशावेळी पोटॅशिअम नायट्रेट ( KNO३ ) १० ते १५ ग्रॅम आणि विद्राव्य डायअमोनियम फॉस्फेट ( DAP ) २ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे २५ ते ३० दिवसांच्या अंतराने फवारणी करावी. यामुळे अन्ननिर्मिती प्रक्रिया गतिमान होण्यास मदत होते.
- बोर्डो पेस्टचा वापर : उन्हामुळे झाडातील पाण्याचे प्रमाण कमी झाल्यास झाडांच्या खोडावरील साली तडकण्याचे प्रमाण वाढू शकते. अशावेळी झाडांचे बुरशीजन्य व इतर रोगांपासून संरक्षण करण्याच्या दृष्टीने खोडांना बोर्डो पेस्ट लावणे गरजेचे असते. सर्वसाधारणपणे १ ते २ मीटर उंचीपर्यंत चुन्याची पेस्ट किंवा बोर्डोपेस्ट लावावी. बोर्डो पेस्ट लावण्याने सूर्यकिरण परावर्तीत होण्यास मदत होते तसेच साल तडकत नाही.
- आच्छादनांचा वापर : उन्हाळ्यात जमिनीतून पाण्याचे बाष्पीभवन अधिक होते. आच्छादनांचा वापर केल्यामुळे बाष्पीभवनाचा वेग कमी करता येतो. त्यामुळे जमिनीत ओलावा टिकवून ठेवण्यास मदत होते. आच्छादनाकरिता पालापाचोळा, वाळलेले गवत, लाकडी भुस्सा, उसाचे पाचट, गव्हाचे काड, भाताचे तूस अशा सेंद्रिय संसाधनांचा वापर करावा. सेंद्रिय आच्छादनाची जाडी १२ ते १५ सेंमी असावी. सेंद्रिय आच्छादनाच्या वापरामुळे जमिनीचा पोत सुधारण्यास मदत होते. आच्छादनासाठी पॉलिथीन फिल्मचा वापरही मोठ्या प्रमाणात केला जातो. आच्छादनासाठी सेंद्रिय पदार्थांचा वापर केल्यामुळे कालांतराने ते कुजून त्यापासून उत्कृष्ट सेंद्रिय खत उपलब्ध होते. त्याचा जमिनीस आणि पिकांना फायदा होतो.
- फायदे काय ? : पावसाचा जमिनीवर पडण्याचा वेग मंदावतो. जमिनीत जास्तीत जास्त पाणी मुरले जाते. जमिनीला भेगा पडण्याचे प्रमाण कमी होते. जमिनीची धूप कमी होते. जमिनीतील पाण्याचे होणारे बाष्पीभवन कमी होते. ओलावा जमिनीत जास्त काळ टिकतो. जमिनीत उपयुक्त जिवाणूंची वाढ होण्यास मदत होते. तणांच्या वाढीस आळा बसतो. जमिनीत योग्य तापमान राखण्यास मदत होते. वनस्पतींना खतांचा जास्त कार्यक्षमतेने उपयोग करून घेता येतो. उन्हाळी हंगामात दोन पाण्याच्या पाळ्यातील कालावधी वाढविता येतो. जमिनीत सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण वाढून जमिनीचा पोत सुधारण्यास मदत होते.

### महत्त्वाच्या बाबी

नारळाच्या लहान रोपांना सावली करणे अत्यंत आवश्यक असते. अन्यथा रोपांची मरतुक होते. केळीचे घड झाकून घ्यावेत. म्हणजे करपणार नाहीत. डाळिंब फळे तडकण्याची शक्यता असते. फळांचे कडक उन्हापासून संरक्षण मिळण्यासाठी कागदी पिशव्या बांधाव्यात. बागेभोवती शेवरी, ग्लिरिसिडीया, मलबेरी, विलायती चिंच, सुबाभूळ यांचे कुंपण करावे. अशा सजीव कुंपणामुळे उष्ण वारे किंवा वादळांमुळे बागेचे नुकसान होत नाही. द्राक्ष, संत्रा, मोसंबी आदी फळझाडांना बोर्डो पेस्ट लावावी. लहान झाडावरील फुले, फळे काढून टाकावीत. झाडांची हलकी छाटणी करून घ्यावी. उन्हाळ्यात आवश्यकता असेल तर रासायनिक खते थोड्या प्रमाणात द्यावीत. फळझाडांवर १ ते १.५ टक्का म्युरेट ऑफ पोटॅशची फवारणी केल्यास फळझाडांना पाण्याचा ताण बसणार नाही.



### पाण्याचा कार्यक्षम वापर


उन्हाळ्यामध्ये शक्यतो ठिबक सिंचन किंवा भूमिगत सिंचन पद्धतीने थेट फळझाडांच्या मुळापाशी गरजेनुसार पाणी देणे फायदेशीर ठरते. या पद्धती दुष्काळी किंवा पाण्याची कमतरता असलेल्या क्षेत्राकरिता अत्यंत फायदेशीर ठरतात. या पद्धतीत इतर प्रचलित पद्धतीपेक्षा ५० ते ६० टक्के पाण्याची बचत होते आणि उत्पादनात १० ते १५ टक्के वाढ मिळू शकते. या पद्धतीमुळे झाडांना गरजेनुसार पाणी उपलब्ध होऊन पाण्याचा अपव्यय टाळला जातो. याशिवाय सिंचनाच्या पाण्याबरोबर खतमात्रा देखील देणे शक्य होते. त्यामुळे खतांवरील खर्चात बचत होते. फळबागेस किंवा पिकांना शक्यतो सकाळी अथवा रात्री सिंचन करावे. त्यामुळे उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर होतो. पाण्याची कमतरता असलेल्या क्षेत्रात एकआड एक सरीने पाणी द्यावे. तसेच पाण्याच्या दोन पाळ्यांमध्ये वाढ करावी. उदा. एखाद्या बागेस १० दिवसांच्या अंतराने पाणी देत असल्यास पुढील पाणी १२ दिवसांनी, त्यापुढील पाणी १५ दिवसांनी द्यावे. अशा प्रकारे जमिनीचा मगदूर, तापमान आणि पाण्याची उपलब्धता या बाबी विचारात घ्याव्यात.

### मडका सिंचन पद्धत


ही पद्धती कमी क्षेत्रातील व जास्त अंतरावरील फळझाडांना पाणी देण्यासाठी आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरते. मडकी शक्यतो जादा छिद्रांकीत किंवा आढीत कमी भाजलेली असावीत. पक्क्या भाजलेल्या मडक्याच्या बुडाकडील बाजूस लहानसे छिद्र पाडावे व त्यात कापडाची चिंधी किंवा नारळाची शेंडी बसवावी. एका झाडासाठी दोन मडकी जमिनीत खड्डा खोदून त्यात ठेवावीत. त्या मडक्यात संध्याकाळी पाणी भरून त्यावर झाकणी किंवा लाकडी फळी ठेवावी. त्यामुळे मडक्यातील पाणी बाष्पीभवनाने वाया जाणार नाही. या पद्धतीमुळे पाण्याची ७० ते ७५ टक्के बचत होते. लहान झाडांना ( दोन ते तीन वर्षांकरिता ) ५ ते ७ लिटर पाणी बसेल इतक्या क्षमतेची लहान मडकी वापरावीत. जास्त वयाच्या मोठ्या झाडांकरिता १० ते १५ लिटर पाणी बसेल अशी मडकी वापरावीत.

### बाष्परोधकांचा वापर

फळझाडांनी जमिनीमधून शोषलेल्या एकूण पाण्यापैकी ९५ टक्के पाणी वनस्पती पर्णोत्सर्जनाद्वारे हवेत सोडतात. हे वाया जाणारे पाणी बाष्परोधकाचा वापर करून अडविता येते. बाष्परोधकांचे पर्णरंध्रे बंद करणारी आणि पानांवर पातळ थर तयार करणारी असे दोन मुख्य प्रकार आहेत. पर्णरंध्रे बंद करणाऱ्या बाष्परोधकांमध्ये फिनील मरक्युरी ॲसिटेट, ॲबसिसिक ॲसिड तर पानांवर पातळ थर तयार करणाऱ्या बाष्परोधकांमध्ये केओलीन, सिलिकॉन ऑइल, मेण यांचा समावेश होतो.



# टोमॅटो पिकातील रोग व्यवस्थापन



**राज्यात टोमॅटोची मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते. महाराष्ट्रातील हवामान या पिकास पोषक आहे. जमीन, पीक, हवामान, पाणी, खत, तसेच रोग व किडींचे योग्य व्यवस्थापन महत्त्वाचे आहे. टोमॅटोवरील विविध रोगांचा प्रादुर्भाव ओळखून वेळीच उपाययोजना करणे आवश्यक आहे. जेणेकरून दर्जेदार उत्पादन मिळण्यास मदत होते.**



### फळसड

- फळधारणेच्या अवस्थेत प्रादुर्भाव जास्त दिसतो. हवेतील वाढलेली आर्द्रता, जास्त तापमान, सतत पाऊस, २४ ते ३० अंश सेल्सिअस तापमान या बाबी रोगाच्या वाढीस पोषक ठरतात. फळाच्या वरील बाजूस गोल आकाराचे तपकिरी डाग एकमेकांत वलये असल्यासारखे दिसतात. सुरुवातीला डाग लहान आकाराचे दिसतात. नंतर पूर्ण फळांवर पसरतात. फळे रंगहीन होते. फळे सडतात.
- व्यवस्थापन : झाडांना आधार द्यावा. जेणेकरून फळांचा जमिनीशी संपर्क येणार नाही. सडलेली पाने व फळे गोळा करून नष्ट करावीत. पाण्याचा चांगला निचरा होईल अशी व्यवस्था करावी. पिकांची फेरपालट करावी. जैविक नियंत्रणासाठी ट्रायकोडर्मा ५ ग्रॅम प्रति एक किलो बियाण्यास चोळावे. लागवडीवेळी ट्रायकोडर्मा पावडर एकरी २ किलो प्रमाणे शेणखतात मिसळावी.
- रासायनिक नियंत्रण : ( फवारणी : प्रतिलिटर पाणी ) : कार्बेन्डाझिम ( ५० टक्के डब्ल्यूपी ) अधिक हेक्साकोनॅझोल ( ५ टक्के डब्ल्यूपी ) ( संयुक्त ) १ ग्रॅम किंवा क्रेसॉक्सिम मिथाईल ( १८ टक्के ) अधिक मॅन्कोझेब ( ५४ टक्के डब्ल्यूपी ) १.५ ग्रॅम ( संयुक्त )

### देवी रोग

- रोगकारक बुरशीचा प्रसार माती व पाण्यातून होतो. बुरशीचा प्रसार पावसाचे थेंब आणि सिंचनाच्या पाण्याद्वारे होतो. पानांवर, खोडावर तसेच देठावर फिक्कट हिरवे ठिपके दिसतात. पाने अर्धवट करपलेली आणि वाकडी दिसतात. खोडावर देठावर तपकिरी रेषा दिसतात. खोडाच्या आतील भाग सुरुवातील पिवळा आणि नंतर लालसर होतो. फळावर गर्द तपकिरी ते काळे उंचवट्याप्रमाणे खडबडीत डाग दिसतात.
- व्यवस्थापन : पिकांची फेरपालट करावी. रोगग्रस्त फांद्या, पाने, फळे तोडून नष्ट करावेत.
- रासायनिक नियंत्रण : पेरणीपूर्वी बियाणांवर रासायनिक प्रक्रिया करावी. त्यासाठी स्ट्रेप्टोमायसीन ( ५०० पीपीएम ) ५०० ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात द्रावण तयार करून बियाणे त्यात ३० मिनिटे बुडवून ठेवावे. नंतर पेरणी करावी. कॉपर ऑक्सिक्लोराइड २.५ ग्रॅम अधिक स्ट्रेप्टोमायसीन १ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून २ ते ३ वेळा फवारणी करावी.

### करपा

- रोगाचा प्रसार माती व पाण्यातून होतो. सिंचनाच्या पाण्यातून प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. पाने पिवळी पडतात. त्यावर तपकिरी व काळपट रंगाचे ठिपके दिसून येतात. हे ठिपके झाडाच्या खोड, फांदीवर दिसून येतात.
- व्यवस्थापन : लागवडीसाठी निरोगी बियाणे वापरावे. पिकाची फेरपालट करावी. पेरणीपूर्वी प्रतिकिलो बियाण्यास ट्रायकोडर्मा ५ ग्रॅम प्रमाणे चोळावे. त्यानंतर कार्बेन्डाझिम ( १५ डब्ल्यू.पी. ) २.५ ग्रॅम याप्रमाणे बीजप्रक्रिया करावी.
- रासायनिक नियंत्रण : ( फवारणी : प्रतिलिटर पाणी ) : मॅन्कोझेब ( ७५ डब्ल्यू.पी. ) २ ग्रॅम याप्रमाणे १० दिवसांच्या अंतराने फवारावे. अझॉक्झिस्ट्रॉबीन ( २३ टक्के एस.सी. ) १ मिलि किंवा मॅन्डीप्रोपॅमीड ( २३.४ टक्के एससी ०.८ मिलि किंवा पायराक्लॉस्ट्रोबीन ( २५ टक्के डब्ल्यूजी ) ०.५ ग्रॅम किंवा थायफ्लूक्झामाइड ( २४ टक्के एससी ) १ मिलि किंवा झायनेब ( ७५ टक्के डब्ल्यूपी ) १.५ ग्रॅम १० ते १५ दिवसांच्या अंतराने आलटून-पालटून फवारावे.

### मर रोग

- हा रोग फ्युजॅरियम किंवा व्हर्टिसिलियम नावाच्या बुरशीमुळे होतो. पीक वाढीच्या कोणत्याही अवस्थेत रोगाचा प्रादुर्भाव होतो. कमी सूर्यप्रकाश आणि २१ ते ३३ अंश सेल्सिअस तापमान पोषक ठरते. सुरुवातीला पानाचे देठ गळणे, शिरा रंगहीन होणे ही लक्षणे दिसतात. त्यानंतर झाडाची जुनी खालच्या बाजूची पाने पिवळी पडतात. नवीन पाने तपकरी होऊन कुजतात. त्यामुळे झाडांचा अन्नपुरवठा खंडित होतो. परिणामी, झाडाची वाढ खुंटते. झाड कोलमडून मरते. प्रादुर्भावग्रस्त झाडाच्या खोडावर बुरशीचा गुलाबी थर दिसतो.
- व्यवस्थापन : पिकाची फेरपालट करावी. वांगी, मिरची व बटाटा या पिकांव्यतिरिक्त इतर पिकांची लागवड करावी. रोगग्रस्त झाडे, पीक अवशेष गोळा करून नष्ट करावीत. नत्रयुक्त खतांचा वापर योग्य प्रमाणात करावा. बी पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करावी. निचऱ्याची जमीन निवडावी. उन्हाळ्यात जमिनीची खोल नांगरट करून जमीन तापू द्यावी. चांगल्या कुजलेल्या सेंद्रिय खतांचा वापर करावा. लागवडीवेळी ट्रायकोडर्मा हे जैविक बुरशीनाशक ५ किलो प्रति हेक्टर प्रमाणे शेणखतात मिसळून जमिनीतून द्यावे. पुनर्लागवड करताना रोपांची मुळे ट्रायकोडर्माच्या द्रावणात बुडवून लावावीत.
- रासायनिक नियंत्रण : ( प्रमाण : प्रतिलिटर पाणी ) : थायोफेनेट मिथिल ( ३८ टक्के ) अधिक कासुगामायसिन ( २.२१ टक्के एससी ) ( संयुक्त ) २.५ मिलि वाफ्यात ओळीलगत आळवणी करावी. कॉपर ऑक्सिक्लोराइड ( ५० डब्ल्यूपी ) ३ ग्रॅम प्रति झाड ५० ते १०० मिलि या प्रमाणे आळवणी करावी.

### रोप कोलमडणे

- लक्षणे : हा बुरशीजन्य रोग रायझोक्टोनिया, फायटोप्थोरा किंवा पिथियम या बुरशीमुळे होतो. रोपवाटिकेत प्रादुर्भाव दिसून येतो. बियाणे पेरल्यानंतर गादीवाफ्यावर रोप उगवून जमिनीवर येण्यापूर्वीच रोगाचा प्रादुर्भाव होऊन मरते. बियांतून बाहेर येणारा अंकुर कुजतो. रोपाचे मूळ व खोडाचा जमिनीलगतचा भाग कुजतो व रोपे उन्मळून पडते.
- व्यवस्थापन : रोपवाटिकेसाठी पाण्याचा निचरा होणारी जमीन निवडावी. गादीवाफ्यांना कमी प्रमाणात पाणी नियमित पाणी देऊन वाफसा स्थिती ठेवावी. बियाणे जास्त दाट पेरू नये. चांगल्या कुजलेल्या शेणखताचा वापर करावा. प्रति किलो बियाण्यास, कार्बेन्डाझिम ( ५० टक्के डब्ल्यूपी ) २.५ ग्रॅम याप्रमाणे बीजप्रक्रिया करावी.
- रासायनिक नियंत्रण ( प्रमाण : प्रतिलिटर पाणी ) : मेटॅलॅक्झिल एम ( ३१.८ टक्के ई.एस ) २.५ ग्रॅम किंवा थायोफेनेट मिथिल ( ३८ टक्के ) अधिक कासुगामायसिन ( २.२१ टक्के एससी ) ( संयुक्त ) २.५ मिलि किंवा कॉपर ऑक्सिक्लोराइड ( ०.३ टक्का ) २.५ ते ३ ग्रॅम या प्रमाणे प्रति झाड ५० ते १०० मिलि या प्रमाणात आळवणी करावी.

### भुरी

- लक्षणे : पानांखाली आणि वरील बाजूस पिठाप्रमाणे पांढऱ्या बुरशीची वाढ झालेली दिसते. पाने, फुले, फळांवर पांढऱ्या बुरशीची पावडर डागांच्या स्वरूपात दिसते. अशी पाने कालांतराने पिवळी होऊन वाळतात, गळून जातात.
- नियंत्रण : ( फवारणी : प्रतिलिटर पाणी ) : कार्बेन्डाझिम ( ७० टक्के ) अधिक हेक्साकोनॅझोल ( ५ टक्के डब्ल्यू.पी. ) ( संयुक्त ) १.५ ग्रॅम किंवा थायोफेनेट मिथिल ( ३८ टक्के ) अधिक कासुगामायसीन ( २.२१ टक्के एस.सी. ) २.६ मिलि. याप्रमाणे १० ते १५ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी.

### पर्णगुच्छ किंवा लीफकर्ल

- या विषाणूजन्य रोगाचा प्रसार पांढऱ्या माशीद्वारे होतो. पाने वेडीवाकडी, बारीक होऊन वरच्या बाजूस वळालेली दिसतात. पानांचा रंग फिकक्ट हिरवा पिवळसर होतो. यामुळे झाडाची वाढ खुंटते. फळे आकाराने लहान राहतात. फांद्यांचे गुच्छ किंवा झुपके तयार होतात. झाड खुजे राहून पर्णगुच्छासारखे दिसते.
- व्यवस्थापन : विषाणूजन्य रोगांचा प्रादुर्भाव झाल्यानंतर नियंत्रण रोगावर प्रभावी नियंत्रण मिळविणे अवघड होते. त्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून रसशोषक किडींचे नियंत्रण करणे आवश्यक आहे. रोपांचे संरक्षण करण्यासाठी, रोप उगवल्यानंतर ६० ते १०० मेशच्या नायलॉन जाळीने किंवा मच्छरदाणीसारखे पांढरे मलमलचे कापड गादीवाफ्यावर टाकावे. रोगग्रस्त झाडे उपटून नष्ट करावीत.

## शॉर्ट न्यूज

### वीटभट्टी कामगारांची लेक झाली अधिकारी

**श्रीगोंदा :** तालुक्यातील म्हातार पिंपरी येथील रहिवासी शेतकरी आण्णासाहेब लक्ष्मण पुराणे यांची कन्या कल्याणी युवराज पुराणे (काळे) यांची महसूल सहाय्यक पदी निवड झाली आहे. घरची परिस्थिती गरिबीची असल्यामुळे वीटभट्टीवर काबाडकष्ट करून कल्याणीचे शिक्षण वडिलांनी पूर्ण केले. पहिल्याच प्रयत्नात तिने यश मिळवून माहेरचे आणि सासरचे नाव मोठे केले. एका वीटभट्टी कामगारांची मुलगी अधिकारी झाल्यावर गावाने मोठा आनंद उत्सव साजरा केला. कल्याणीने मिळविलेल्या यशाबद्दल तिचे तालुक्यात सर्वत्र कौतुक होत आहे.

### जिल्हा सहकारी बँकेची यादी जाहीर

**अहिल्यानगर :** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या भरती प्रक्रियेत लिपिक, वाहनचालक व सुरक्षा रक्षक या पदांच्या भरतीसाठीची मुलाखतीची यादी बँकेने जाहीर केली आहे. लिपिक पदाच्या ६८७ जागा असून, त्यासाठी २ हजार २६१ उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे. मुलाखतींतून उमेदवारांची अंतिम निवड होणार आहे. या भरतीसाठी बँकेने गत १२ सप्टेंबर रोजी जाहिरात प्रसिद्ध केली होती. वर्क वेल या कंपनीमार्फत भरती प्रक्रिया राबवली जात आहे. भरतीसाठी ऑनलाइन परीक्षा घेण्यात आली.

### केडगावमध्ये तिघांकडून युवकावर हल्ला

**केडगाव :** उपनगरातील विश्वयनराजे कमानीजवळ एका युवकावर तिघांनी कोयता, तलवार आणि लोखंडी रॉडने हल्ला केल्याची घटना घडली आहे. अजय किशोर शिंदे (वय १८ रा. लालानगर, केडगाव) असे जखमी युवकाचे नाव आहे. त्याच्यावर रूग्णालयात उपचार सुरू असून उपचारादरम्यान दिलेल्या जबाबावरून कोतवाली पोलीस ठाण्यात तिघांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सागर तरटे, रोहित बनसोड, समीर शेख (पूर्ण नावे माहिती नाही, रा. केडगाव देवी जवळ, झेंडा चौक, केडगाव) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयित आरोपींची नावे आहेत.

### किरकोळ भांडणावरून भावजयीचा खून

**अकोले :** किरकोळ भांडणावरून दारूच्या नशेत भावजयीचा टनक हत्याराने डोक्यावर तोडावर, अंगावर मारहाण करून खून केल्याची घटना अकोले तालुक्यातील उंचखडक बु येथे घडली. अकोले पोलिसांनी तात्काळ आरोपी राजू शंकर कातोरे यास ताब्यात घेतले आहे. याबाबत अकोले पोलिसांत मयत जिजाबाई शिवराम खोडके याचा मुलगा सुनिल शिवराम खोडके (वय २४ रा. उंचखडक बु ता. अकोले) याने फिर्याद दिली आहे.

### महसूल मंडळाची फेररचना होणार

**संगमनेर :** महसूल मंडळाची फेररचना केल्याशिवाय आश्वी येथील अप्पर तहसिल कार्यालयाचा प्रस्ताव मंजूर करू नका आशी मागणी आमदार अमोल खताळ यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पालक मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि महसूल विभागाच्या अप्पर सचिवांकडे केली असून, तशा सूचनाही त्यांनी जिल्हा प्रशासनास दिल्या असल्याचे सांगितले ही माहिती आमदार खताळ यांच्या प्रसिद्धी विभागा कडून देण्यात आलेल्या प्रेस नोट मध्ये दिली आहे.

# खेळाच्या मैदानांचा खेळासाठीच वापर करा

## अजित पवार यांचे निर्देश । भूखंड भाडेपट्टा नूतनीकरणासाठी नवीन धोरण ठरवणार



**मुंबई : प्रतिनिधी**

**खेळांना आणि खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचे राज्य सरकारचे धोरण आहे. मुंबईतील ओव्हल मैदान, आझाद मैदान व क्रॉस मैदानातील भूखंडांच्या भाडेपट्टा कराराचे क्रीडा क्लबसोबत नूतनीकरण करण्यासाठी महसूल, क्रीडा, सार्वजनिक बांधकाम व नगरविकास विभागाने एकत्र येऊन समन्वयाने स्वतंत्र, सर्वसमावेशक धोरण तयार करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज दिले. कोणत्याही परिस्थितीत खेळांची मैदाने केवळ खेळांसाठीच वापरण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.**

मुंबईतील आझाद मैदान, क्रॉस मैदान आणि ओव्हल मैदानातील भूखंडांच्या भाडेपट्टा कराराच्या नूतनीकरणासंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे (दूरदृश्य प्रणालीद्वारे), महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी (दूरदृश्य प्रणालीद्वारे), क्रीडा विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. के. एच. गोविंदराज, सार्वजनिक बांधकाम विभाग (रस्ते)चे सचिव सदाशिव साळुंखे, क्रीडा विभागाचे आयुक्त हिरालाल सोनवणे (दूरदृश्य प्रणालीद्वारे), नियोजन विभागाचे सहसचिव दीपक देसाई, महसूल विभागाचे उपसचिव धनंजय निकम, नगरविकास विभागाचे सहसचिव निर्मलकुमार चौधरी, विधी व न्याय विभागाच्या उपसचिव मनिषा कदम, मुंबईचे अतिरिक्त जिल्हाधिकारी रविंद्र कटकधोंड, मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अजिंक्य नाईक, उपाध्यक्ष संजय नाईक, सचिव अभय हडप, सहसचिव दीपक पाटील, खजिनदार अरमान मल्लिक, कार्यकारी सचिव सी. एस. नाईक, सदस्य संदीप विचारे, प्रमोद यादव आणि महाव्यवस्थापक किंजल पटेल आदी मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, मुंबईतील आझाद मैदान, ओव्हल मैदान व क्रॉस मैदान ही सर्व खेळांसाठी महत्त्वाची मैदाने आहेत. या मैदानांवर हजारो क्रीडापटू रोज विविध क्लबच्या माध्यमातून प्रशिक्षणासह खेळाचा सराव करत असतात. या तिन्ही मैदानाची मालकी महसूल विभागाची आहे. क्रीडा विभागामार्फत ती खेळाच्या क्लबला भाडेपट्टा कराराने देण्यात येतात. सध्या या तिन्ही मैदानांवरील भूखंडांवर साठहून अधिक क्लब खेळाडूंना प्रशिक्षणाच्या व सरावाच्या सुविधा देतात. या क्लबचा भाडेपट्टा करार संपला असून तो पुन्हा करण्यासाठी महसूल विभाग, क्रीडा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व नगरविकास विभागाने एकत्र येऊन समन्वयाने एक स्वतंत्र, सर्वसमावेशक धोरण तयार करावे. हे नव्याने तयार करण्यात येणारे धोरण मंजुरीसाठी मंत्रिमंडळासमोर ठेवून त्याला अंतिम स्वरूप देण्यात येईल. महसूल, क्रीडा, सार्वजनिक बांधकाम व नगरविकास या चारही विभागांनी विहित वेळेत भाडेपट्टा करारासाठीचे सर्वसमावेशक धोरण तयार करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

तसेच आझाद मैदान, ओव्हल मैदान व क्रॉस मैदानावर खेळाडूंसाठी स्वच्छतागृहे व चेंजिंग रूम उभारण्याच्या सूचना देताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, ही स्वच्छतागृहे अत्याधुनिक करताना खेळाच्या सरावाला बाधा येऊ नयेत, तसेच मैदानाचे सौंदर्य खराब होऊ नये याची दक्षता घेत ती मैदानाच्या एका कोपऱ्यात उभारण्यात यावीत. कोणत्याही परिस्थितीत खेळाच्या मैदानांचा वापर केवळ खेळांसाठीच व्हावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

# पंतप्रधान मोदींनाही पडली ‘छावा’ची भुरळ !

## दिल्लीच्या विज्ञान भवनात जय भवानी जय संभाजी अशा घोषणा





**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

**नुकत्याच दिल्लीत पार पडलेल्या पार पडत असलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठी भाषेचे कौतुक केले. मराठी आणि हिंदी या दोन्ही भाषांमध्ये बोलत असताना त्यांनी मध्ययुगीन काळापासून ते अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त होईपर्यंतच्या महत्त्वाच्या घटनांचा आणि महापुरूषांचा उल्लेख करून त्यांना वंदन केले. मुंबईमुळेच मराठी आणि हिंदी चित्रपटांना उभारी मिळाली. आणि सध्या तर ‘छावा’ची धूम आहे’’, असे पंतप्रधान मोदी म्हणताच सभागृहात एकच जल्लोष झाला.**

त्यांच्या छावाबद्दल केलेल्या वक्तव्याला टाळ्यांच्या कडकडाट करत उपस्थितांनी दाद दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ‘छावा’ चित्रपटाचा उल्लेख करताच दिल्लीच्या विज्ञान भवनात जय भवानी, जय संभाजी अशा घोषणा दिल्या गेल्या. यानंतर पंतप्रधान मोदी म्हणाले, छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्याचा परिचय शिवाजी सावंत यांच्या ‘छावा’ या कादंबरीने करून दिला. मराठी मातीत छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, पहिले बाजीराव पेशवे यांनी त्याकाळात शत्रूंना पराभूत करून जेरीस आणले. यांच्यासह स्वातंत्र्यात योगदान असलेले व ब्रिटिशांविरोधात लढा देणारे वासूदेव बळवंत फडके, लोकमान्य टिळक आणि वीर सावरकर सारख्या सेनानींनी ब्रिटिशांची झोप उडवली. केसरी आणि मराठा या वर्तमानपत्रांनी भाषेला आकार दिला. मराठी साहित्यातून राष्ट्रप्रेमाचा ज्वर दिसून आला. संपूर्ण राष्ट्राची मशागत मराठी साहित्याने केल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले.

# अतिक्रमण हटाव मोहीम सुरूच राहणार

## मनपा आयुक्त यशवंत डांगे यांची माहिती




**नगर : प्रतिनिधी**

**महापालिकेने बाजारपेठेत अतिक्रमण हटाव मोहीम सुरू केली आहे. माणिक चौक परिसरात रस्त्यावर व्यवसाय थाटणाऱ्या अतिक्रमणधारकांचे साहित्य जप्त करून त्यांना प्रत्येकी दोन हजार रुपये दंड आकारण्यात आला. अतिक्रमण हटाव मोहीम सुरूच राहणार असल्याचेही आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी सांगितले. तसेच जप्त केलेले साहित्य परत मिळणार नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.**

बाजारपेठेसह संपूर्ण शहरात महापालिकेने अतिक्रमणांवर कारवाईचे नियोजन केले आहे. मंगळवारी दिवसभरात केलेल्या कारवाईत अनेकांचे साहित्य जप्त करण्यात आले. भिंगारवाला चौक ते तेलीखुंट चौक या ठिकाणी रस्त्यावर उभ्या असलेल्या २० पेक्षा जास्त विक्रेत्यांचे साहित्य, कपड्याचे गठ्ठे, जाहिरात फलक, दुकानांसमोरील लोखंडी जाळ्या जप्त करण्यात आल्या. शहाजी रोडवरील सारडा गल्ली कॉर्नर ते पोखरणा ज्वेलर्स पर्यंत रस्त्याच्या मधोमध उभ्या असलेल्या ४० ते ५० हातगाड्यावर कारवाई करून साहित्य जप्त करण्यात आले.

सारडा गल्ली ते मोहन ट्रंक डेपोपर्यंत रस्त्यावर १५ व्यवसायिक, दुकानदारांनी लोखंडी स्टूल, टेबल व जाळ्या टाकून अतिक्रमण केले होते. त्यांचे सर्व साहित्य जप्त करण्यात आले. मोची गल्ली, गंज बाजार व सराफ बाजारांमधील ५० पेक्षा जास्त हातगाडीधारक, पथविक्रेते यांचे साहित्य, टेबल, ताडपत्री, बांबू, जाहिरात फलक, गाड्या जप्त करण्यात आल्या. गुरुवारीही या भागात पथक गस्त घालत होते. त्यानंतर पथकाने माणिक चौक परिसरात मोर्चा वळवला. तेथे रस्त्यावर अतिक्रमण केलेल्या व्यावसायिक, विक्रेत्यांवर कारवाई करून दोन हजार रुपये दंड करण्यात आला.

# राज्यात पुन्हा डान्सबार सुरू होण्याची शक्यता

## महाराष्ट्राची संस्कृती वाचवण्यासाठी आम्ही मैदानात उतरू । आ.रोहित पाटलांचा इशारा

**सांगली : प्रतिनिधी**

**राज्य मंत्रिमंडळात डान्सबार कायदा सुधारणेबाबत चर्चा झाली असून डान्सबार पुन्हा सुरू करण्याची तयारी सुरू असल्याचे समजते. यावरून राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे आमदार व आर. आर पाटील यांचे पुत्र रोहित पाटील यांनी इशारा दिला आहे. सरकार जर डान्सबार सुरू करण्याचा घाट घालत असेल तर महाराष्ट्राची संस्कृती वाचवण्यासाठी आम्ही मैदानात उतरू, असा इशारा रोहित पाटील यांनी दिला आहे.**

राष्ट्रवादी कॉंग्रेसचे दिवंगत नेते आर आर पाटील हे गृहमंत्री असताना डान्सबार बंदी केली होती.२००५ साली संपूर्ण राज्यात डान्सबारवर बंदी आणण्याचा निर्णय आर आर पाटील यांनी घेतला होता. मात्र, आता पुन्हा राज्यात डान्सबार सुरू होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यावर मंत्रिमंडळात चर्चा देखील झाल्याची माहिती आहे. नवीन कायद्यावर चर्चा झाल्याची माहिती असून





लवकरच हा कायदा विधानसभेत मांडला जाणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, राज्य सरकार जुन्या कायद्यात सुधारणा करून नवीन नियम लागू करण्याच्या तयारीत आहे.

२००५ साली आर आर पाटील यांनी डान्सबार बंदी केली होती. ही बंदी २०१९ साली उठवण्यात आली होती. सर्वोच्च न्यायालयाने जानेवारी २०१९ मध्ये ही बंदी उठवत काही नियम लागू करण्याचा आदेश दिला होता. त्यानुसार आता राज्य सरकार नियमात बदल करून डान्सबार सुरू करण्याच्या प्रयत्नात असल्याची माहिती आहे.

**नव्या तरतुदी काय असणार?**

डान्सबारमध्ये नोटांची उधळण करता येणार नाही
डिस्को आणि ऑक्रेस्ट्रा संदर्भात राज्य सरकारची परवानगी
संदर्भात ही बदल करण्यात येणार
डान्सबार संदर्भात नियम आणि कायदा करताना समितीमध्ये डान्सबारचा प्रतिनिधी असावा
डान्सबार फ्लोअरवर चारपेक्षा अधिक बारबाला नको
बारबाला आणि ग्राहकांमध्ये किमान दोन मीटरचे अंतर असावे
ग्राहकांना डान्स फ्लोअरवर जाता येणार नाही
डान्सबारमध्ये धूम्रपानास मनाई
बारबालांचे वय १८ वर्षांपेक्षा कमी नसावे
बारमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत
गाड्यांसाठी पार्किंगची व्यवस्था असावी

# शासकीय योजनेच्या निधीत पुन्हा अपहार

## दोन कर्मचाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल

**नगर : प्रतिनिधी**

**शासकीय योजनांचा निधी वैयक्तिक खात्यात घेऊन अपहार केल्याची जिल्ह्यातील दुसरी घटना समोर आली आहे. जिल्हा परिषदेने शासकीय योजनांच्या देयकातून कपात केलेले ५८ लाख २० हजार रुपये कर्मचाऱ्यांनी परस्पर हडप केले. हा प्रकार जानेवारी ते ऑगस्ट २०२४ दरम्यान घडला असून याबाबत जिल्हा परिषदेच्या दोन कनिष्ठ सहायकांच्या विरोधात कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

अशोक अंबादास पंडित (वय ४२, रा. कर्जत) व रोहित शशिकांत रणशूर (वय २९, रा. बोल्हेगाव) असे गुन्हा दाखल झालेल्या संशयित कर्मचाऱ्यांची नावे आहेत. जिल्हा परिषदेतील सहायक लेखा अधिकारी रावसाहेब शंकर फुगारे यांनी याबाबत फिर्याद



दिली आहे. जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाला विविध शासकीय योजनांतून निधी उपलब्ध होत असतो. या निधीतून जीएसटी, विमा, कल्याण निधी कपात केली जाते. मात्र, निधीत अपहार झाला असल्याचा संशय मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांना आला. त्यानुसार त्यांनी चौकशीचे आदेश दिले.

त्यानुसार ५८ लाख २० हजार रुपयांचा अपहार झाल्याचे समोर आले. याबाबत कोतवाली पोलीस ठाण्यात दोन कर्मचाऱ्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(पान १ वरून)

## जिल्ह्यातील दहशतीची किड नष्ट केली!

विरोधकांनी संभ्रम निर्माण केला
मा. खा. डॉ. सुजय विखे यांनी गेल्या पाच वर्षात कोट्यावधी रूपयांची विकास कामे माग लावली. आळेफाटा शिरूर रस्त्यासाठी ३८६ कोटी रूपये निधी मंजुर करण्यात आला असून त्याचा शुभारंभ लवकरच होणार आहे. खा. विखे यांनी भरपूर विकास कामे केली मात्र विरोधकांनी अप्रप्रचार करून संभ्रम निर्माण करण्याचाच प्रयत्न केला.

**पिंपळगांव जोगासाठी रविवारी बैठक**

तालुक्यातील विकास कामांसाठी आपण सातत्याने पाठपुरावा करत असून पिंपळगांव जोगा कालव्याचे काम मार्गी लावण्यासाठी रविवारी अळकुटी येथे बैठक घेण्यात येणार असल्याचेही आ. दाते यांनी सांगितले.

### गायत्रीताई हे अती होतंय !

असे पवार यांनी म्हटले आहे.

**गौण खनिजाचे खुलेआम उत्खनन**

पारनेर तहसिल कार्यालयाच्या हद्दीत मोठया प्रमाणावर अवैध गौण खनिज उत्खनन केले जात आहे. शासनाचा महसूल खुलेआम बुडवून कोटयावधी रूपयांना चुना लावण्यात येत आहे. तहसिलदारांकडे पुराव्यासह तक्रार करूनही कोणत्याही प्रकारे कारवाई करण्यात येत नाही. उलट त्यांना पाठीशी घालण्यात येत असल्याने महसूल विभाग संशयाच्या भोवऱ्यात सापडला असल्याचे पवार यांचे म्हणणे आहे.

**तर परतीचे तिकीट काढून ठेवा !**

गोर-गरीब जनतेला स्वस्त धान्य दुकाणदार धान्य देत नाही. कोटा कमी आल्याचे कारण दिले जाते. रेशनिंगचा काळा बाजार होत असल्याचेही मनसेच्या वतीने निदर्शनास आणून देण्यात आले.मात्र त्याविरोधात काहीही कारवाई करण्यात आलेली नाही. पारनेर तहसिल कार्यालयातील अनागोंदीविषयी लवकरच जिल्हाधिकाऱ्यांनी भेट घेणार असल्याचे सांगतानाच जनतेला गृहीत धरून वेठीस धरणार असाल तर परतीचे तिकीट काढून ठेवा अशी उपहासात्मक टीका अविनाश पवार यांनी केली आहे.

**पुढारी गप्प का ?**

पारनेरच्या जनतेने ज्यांना ज्यांना संधी दिली, खुर्ची दिली त्यांनी जनतेला वाऱ्यावर सोडलंय असे चित्र सध्या निर्माण झाले आहे. पारनेरच्या सर्वसामान्य जनतेचे हाली होत असताना पारनेरचे पुढारी गप्प का ? पोलीस ठाणे असो किंवा कोणतेही शासकीय कार्यालय असो. नव्याने अधिकारी आल्यावर अनेक जण पुष्पगुच्छ देऊन फोटोसेशन करतात. मग आता पारनेर तहसिल कार्यालयात कागदही हालायला तयार नसताना पुष्पगुच्छावाले कुठे गायब झाले आहेत ?
अविनाश पवार
राज्य उपाध्यक्ष, मनसे माथाडी सेना

## सुरेश धसांना आता परळीतूनही विरोध

यांना बीडचे ॲडिशनल एसपी म्हणून नियुक्त केले पाहिजे. तर पोलिसांचे हेड बदलले तर पोलिसही बदलावे अशी मागणी त्यांनी मस्साजोग मध्ये देशमुख कुटुंबीयांची भेट घेतल्यानंतर माध्यमांशी बोलताना केली आहे. त्यानंतर धस यांनी महादेव मुंडे यांच्या कुटुंबीयांची देखील भेट घेतली. दरम्यान परळी शहरात त्यांना नागरिकांनी काळे झेंडे दाखवत धस यांनी परळीची बदनामी केली असल्याचा आरोप केला आहे.

सुरेश धस यांनी जाणीवपूर्वक केवळ वंजारी कर्मचाऱ्यांना टार्गेट केले सुरेश धस यांनी बीड जिल्ह्यामध्ये खलनायकाची भूमिका सुरू केली आहे. ती खलनायकाची भूमिका बीड जिल्ह्यातील कोणत्याही सुज्ञ नागरिकाला आवडत नाही. बीड जिल्हा क्रांतिकारकांची आणि संतांची भूमी आहे. या भूमीमध्ये सुरेश धस यांनी जाणीवपूर्वक बीड जिल्ह्यातील केवळ वंजारी कर्मचाऱ्यांना टार्गेट केले असल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. ७४७ शिक्षकांच्या संदर्भात देखील ते अतिशय चुकीचे बोलले आहेत. सुरेश धस साधे राज्यमंत्री असताना मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या समोरील संगणक त्यांनी पळून नेला. त्यामुळे ते संगणक चोर असल्याचा आरोप या आंदोलनकर्त्यांनी केला आहे.

**कर्मचारी आणि पोलिसांवरही बेमालूम पद्धतीने आरोप**

संतोष देशमुख यांच्या हत्येचा आम्ही निषेधच करतो. मात्र या घटनेच्या आडून सुरेश धस यांनी ज्या पद्धतीने राजकारण सुरू केले असल्याचा आरोप या आंदोलकांनी केला आहे. महिला कर्मचारी आणि पोलिसांवरही सुरेश धस यांनी बेमालूम पद्धतीने आरोप केले आहे. त्यांचा आम्ही जाहीर निषेध करत असल्याचे आंदोलनकर्त्यांनी म्हटले आहे. विशेष म्हणजे हे आंदोलन पंकजा मुंडे यांच्या परळी तील घराच्या अगदी जवळ झाले.

# अळकुटीत कर्तुत्ववान महिलांचा सन्मान

## अळकुटी ग्रामीण पतसंस्थेचा उपक्रम

अळकुटी : प्रतिनिधी

**कला, क्रीडा, शैक्षणिक,आरोग्य व सामाजिक क्षेत्रात तसेच दैनंदिन जीवनात संघर्ष करत यश संपादन करणाऱ्या जिजाऊंच्या लेकींचा अळकुटी ग्रामीण पतसंस्थेच्या वतीने सन्मान करण्यात येऊन शिवजयंती उत्सव साजरा करण्यात आला.**

छत्रपती शिवाजी महाराजांच दिलेल्या संस्कारामधील महत्वाचा संस्कार म्हणजे स्त्रियांचा सन्मान हा आदर्श समोर ठेऊन अळकुटी ग्रामीण पतसंस्थेच्या वतीने गेल्या चार वर्षांपासून महिलांच्या उपस्थितीत शिवजयंती उत्सव मोठया उत्साहात साजरा करण्यात येतो. यावेळी बीड येथील प्रा. प्रशांत इंगळे यांचे शिवव्याख्यान पार पडले. यावेळी कर्तुत्ववान महिलांचा सन्मान जिजाऊंच्या लेकींचा पुरस्कार देऊन तसेच रांगोळी स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसे देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी पतसंस्थेचे चेअरमन महेश शिरोळे, उपाध्यक्ष नवनाथ शिरोळे, व्यवस्थापक सुरेश घोलप यांच्यासह संचालक मंडख तसेच सेवा संस्थेचे



■ अळकुटी पतसंस्थेच्या वतीने विविध क्षेत्रातील कर्तुत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला.

चेअरमन सुभाष पुंडे, शरद घोलप, सुदाम शिरोळे, डॉ. स्मिता शिरोळे, रजनी थोरात, अलका शिरोळे,गौरी शिरोळे, अर्चना पुंडे, मिरा शिरोळे, लता घोलप, अर्चना मते, शरदा शिरोळे, सविता पानमंद, सुनंदा झावरे, स्वाती शिरोळे, प्रतिभा पानसरे, नेहा हांडे, अर्चना पंडीत, डॉ. रेष्मा गुंड, मोनिका थोरात, मनिषा दाते, दिप्ती क्षिरसागर, कोमल महामुनी, भाग्यश्री शित्रे, जयश्री शिरोळे, ज्योती शिरोळे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

### या महिलांचा झाला सन्मान

या सोहळ्यात विविध क्षेत्रात तसेच दैनंदिन जीवनात संघर्ष करत यश संपादन केलेल्या पदमावती लामखडे, रेखाबाई मावळे, कासुबाई जाधव, नसरीन तांबोळी, उषा चौधरी, सुशिला शिरोळे, मिराबाई शिंदे, हिराबाई शिरोळे, अश्विनी दाते, साक्षी भंडारी, शांताबाई थोरात, कांता परंडवाल या कर्तुत्ववान महिलांचा सन्मान जिजाऊंच्या लेकीचा पुरस्कार उपस्थित महिलांच्या हस्ते देऊन सन्मान करण्यात आला.

### महिला सक्षमीकरणासाठी निरंतर कार्यरत

अळकुटी पतसंस्था महिलांच्या सबलीकरणासाठी नेहमी विविध उपक्रम राबवत आहे. गेल्या चार वर्षापासून महिलांच्या उपस्थितीत शिवजयंती सोहळा साजरा करण्यात येत आहे. महिलांचा सन्मान हा इतर महिलांसाठी प्रेरणादायी ठरत असतो. त्यामुळे शिवरायांचा वारसा जपत विविध क्षेत्रात यश संपादन करणाऱ्या महिलांचा यंदा सन्मान करण्यात आला. यापुढील काळातही महिला सक्षमीकरणासाठी आम्ही निरंतर कार्यरत राहणार आहोत.

**महेश भास्करराव शिरोळे**
चेअरमन, अळकुटी पतसंस्था

# हरीनामाच्या जयघोषणाने अहंकार नष्ट होतो

■ दत्तात्रय महाराज बोरूडे यांचे प्रतिपादन
■ नागेश्वर मंदिरात अखंड हरीनाम सप्ताहास प्रारंभ

पारनेर : प्रतिनिधी

**संत तुकाराम महाराजांनी सदा जयघोष हरीनाम या अभंगातून मनुष्याला संदेश देताना जीवनातील अहंकार नष्ट करण्यासाठी सदा हरीनाम जयघोष महत्वाचा असल्याचे प्रतिपादन युवा किर्तनकार ह.भ. प.दत्तात्रय महाराज बोरूडे पुणेवाडीकर यांनी केले.**



महाशिवरात्रीनिमित्त दरवषप्रमाणे यंदाही पारनेर शहराचे ग्रामदैवत नागेश्वर मंदिरामध्ये अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहाच्या पहिल्या दिवशी ह भ प दत्तात्रय महाराज बोरूडे यांचे किर्तन पार पडले.

यावेळी बोलताना दत्ता महाराज बोरूडे म्हणाले, हरीनाम सप्ताह हा आत्मशुध्दीचा मार्ग आहे. संत तुकाराम महाराजांनी सांगितल्याप्रमाणे सतत नामस्मरण केल्याने अहंकार नष्ट होतो. मन शांत राहते आणि जीवनात खरी समृध्दी मिळते. नागेश्वर मंदिरातील अखंड हरीनाम सप्ताहास ४१ वर्षांची परंपरा आहे. हे सातत्य कायम आहे ही आनंदाची बाब आहे.

गुरूवारी सकाळी हभप रामदास महाराज थोरात यांच्या रसाळ वाणीतून ज्ञानेश्वरी पारायण सोहळयास प्रारंभ झाला. यावेळी हभप पदमाकरदादा घोडके, दिनकर महाराज बडवे, विश्वनाथ महाराज बडवे, प्रकाश घोडके, मधुकर मोढवे, डॉ. नरेंद्र मुळे, गणेश कावरे, कल्याण थोरात आदी उपस्थित होते. या सप्ताहामध्ये दररोज राज्यातील नामवंत किर्तनकार किर्तन सेवा देणार आहेत.

### मान्यवरांचे योगदान

या सोहळयासाठी मा. नगराध्यक्ष विजय औटी, नगरसेवक अशोक चेडे, किशोर शहाणे, सभापती सुरेखा भालेकर, योगेश मते, डॉ. विद्या बाळासाहेब कावरे, बाळासाहेब देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेस शेतकरी सेलचे अध्यक्ष इंद्रभान गाडेकर, बबनदादा चौरे, वैष्णवी उद्योग समुहाचे संभाजी मगर यांच्या योगदानातून या सप्ताहात किर्तनकार किर्तन सेवा देण्यात येणार आहे.

# दुर्गादेवीच्या मिरवणूकीत लेझीम पथकाचे आकर्षण!

## शिवजयंती उत्साहात साजरी



ढवळपुरी : प्रतिनिधी

**दुर्गादेवी विद्यालयाच्या वतीने शिवजयंती निमित्त काढण्यात आलेल्या मिरवणूकीमध्ये विद्यालयाचे लेझीम पथक ढवळपुरीकरांसाठी आकर्षण ठरले.**

मराठमोठया पोखाशात शिवजयंती उत्सव साजरा करण्यासाठी विद्यालयात जमलेच्या विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे भरते आले होते. यावेळी सेवा संस्थेचे चेअरमन भागाजी गावडे, माजी सरपंच डॉ. राजेश भनगडे, उपसरपंच बबनराव पवार, ग्रामपंचायत सदस्य मच्छिंद्र व्यवहारे, रमेश केदारी, संदीप थोरात, मंजाबापू चौधरी, राजू पथवे, प्राचार्य आदम शेख यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात येउन आरती करण्यात आली. यावेळी ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

विविध विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणामधून छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील विविध प्रसंग कथन करत त्यांच्या कर्तुत्वाचा आढावा घेतला. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य आदम शेख, लक्ष्मण झंजाड, संजय दळवी, संतोष व्यवहारे, सहादू भोंडवे, राहुल झावरे, अजित सांगळे, सुभाष अडसूळ, राहुल नवले, भगवान राउत, तुकाराम हराळ, संदीप खिलारी, कुमावत भाऊसाहेब, वर्षा शेळके, हर्षा जायभाये, गायत्री पवळ, सरवीन पटेल, वसतीगृह अधिक्षक सुळे, शब्बीर शेख, राम चौरे, यमाजी झेंडे, फारूक शेख, विश्वनाथ चौधरी आदी यावेळी उपस्थित होते. भगवान राऊत यांनी सुत्रसंचलन तर अजित सांगळे यांनी आभार मानले.

### सवाद्य मिरवणूक

शिवप्रतिमेचे पुजन करण्यात आल्यानंतर सजविण्यात आलेल्या रथामधून शिवाजी महाराजांची वेशभुषा केलेल्या विद्यार्थ्यांची तसेच मावळयांची लेझीम पथकासह सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. ठिकठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. विद्यालयाचे विद्यार्थी आणि विद्याथनी यांनी शिवाजी महाराजांच्या जीवनावर अधारित गीतांच्या तालावर लेझीम नृत्य सादर करत लक्ष वेधून घेतले.

# सुभाष मगर यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

## माजी विद्यार्थी संघांचा पुरस्कार



निघोज : प्रतिनिधी

**निघोज येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील ज्येष्ठ शिक्षक हभप सुभाष महाराज मगर यांना मुंबई येथील पदमभूषण ताराबाई मोडक अध्यापक विद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघाच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. मगर यांना हा पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर त्यांच्यावर परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.**

कुर्ला, मुंबई येथील गांधी बाल विद्या मंदिर हायस्कुल येथे या पुरस्कार वितरण सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अध्यापक विद्यालयाच्या सेवानिवृत्त शिक्षिका जयश्री घैसास या होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून हास्य सम्राट कलाकार जॉनी रावत हे उपस्थित होते.

प्राथमिक शिक्षक ह.भ.प. सुभाष महाराज मगर यांना यापूर्वीही अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. पारनेर तालुक्यातील आम्ही टाकळीकर ग्रुपच्या वतीने त्यांना आदर्श शिक्षक पुरस्कार तर देवीभोयरे येथील वसुंधरा प्रतिष्ठानच्या वतीने मगर महाराज यांना आदर्श शिक्षक व समाज प्रबोधन पुरस्कार प्रदान करण्यात आलेला आहे.

निघोजच्या रसाळवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तसेच दुर्गम भागातील गाजदीपुर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे मगर महाराज यांनी अध्यापन करताना विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास करण्यासाठी योगदान दिले आहे. सध्या निघोज शाळेचा सर्व स्तरावर नावलौकिक असून त्यातही मगर महाराज यांचे योगदान आहे.

केंद्र प्रमुख बाचकर, मुख्याध्यापक कैलास शिंदे,ज्येष्ठ शिक्षक काळे, काळोखे, शिक्षिका दिघे, सालके तसेच पारनेर तालुका पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी मगर महाराज यांचे पुरस्काराबद्दल अभिनंदन केले.

# नव्या संकल्पना बाजारात आणतो तो नवउद्योजक

## वैभव खैरनार यांचे प्रतिपादन

पारनेर : प्रतिनिधी

**जमीन, मनुष्यबळ व भांडवल यांची जुळवाजुळव करतो तो उद्योजक तर समाजाच्या गरजा पुर्ण करतो तो यशस्वी उद्योजक आणि नवीन संकल्पना, नवे उत्पादन बाजारपेठेत पहिल्यांदा आणतो तो नव उद्योजक असल्याने प्रतिपादन जिल्हा उद्योग केंद्राचे पर्यवेक्षक वैभव खैरनार यांनी केले.**



पारनेर येथील न्यू आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजमध्ये एम कॉम पदव्युत्तर विभागाच्या वतीने आयोजित नव उद्योजकता विकास आणि व्यवसाय समुपदेशन कार्यशाळेचे उदघाटन खैरनार यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी त्यांनी उपस्थितांशी संवाद साधला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे विद्यार्थी विकास मंडळ, पारनेर महाविद्यालयाचा अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व वाणिज्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी खैरनार यांनी सहभागी विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्राशी सबंधित विविध शासकीय योजनांची माहिती दिली. शेतीपूरक उद्योग उभारणीसाठी त्यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रामध्ये प्रतिथयश उद्योजक सुनील कानवडे यांनी स्वतःच्या उद्योग उभारणीतील आव्हाने, आलेल्या अडचणी व त्यातून शोधलेल्या विविध संधी आण त्यातून आलेले अनुभव त्यांनी विद्यार्थ्यांपुढे कथन केले.

कार्यशाळेच्या तिसऱ्या व अखेरच्या सत्रात तरूण नवउद्योजक प्रणव पवार यांनी उद्योगांच्या नव प्रवर्तनात येणाऱ्या विवधि तांत्रीक घटकांचे पीपीटी प्रेझेंटेशन करून विश्लेशन केले.

कार्यशाळेमध्ये पारनेर व टाकळीढोकश्वर व अळकुटी महाविद्यालयातील १२० विद्यार्थी सहभागी झाले होते. वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. युवराज वाघेरे यांनी तीनही सत्रातील तांत्रीक बाबींचा आढावा घेत कार्यशाळेचा समारोप केला. प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर, उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे, डॉ. दत्तात्रय घुंगार्डे, डॉ. रवींद्र देशमुख आदी यावेळी उपस्थित होते. डॉ. भूषण भालेराव यांनी प्रास्ताविक, प्रा. रोहिणी म्हसे यांनी सुत्रसंचलन तर प्रा. तुषार गालबोटे व प्रा. सविता पिंगट यांनी विविध सत्रांमध्ये आभार प्रदर्शन केले.

### नव उद्योजकतेचे सार्थ उदाहरण

कोरोना महामारीच्या काळात मुख्य उत्पादन बाजूला ठेऊन मास्क निर्मिती करत त्यात प्रचंड यश मिळविले. नव तरूणांसमोर व्यवसायातील नवी संधी शोधण्याचा कानमंत्र देताना कानवडे यांनी स्वतः विविध २८ उद्योग उभे करून वैभव खैरनार यांनी नव उद्योजकतेचे सार्थ उदाहरण विद्यार्थ्यांसमोर ठेवले.

# उत्तम घोलप यांना महाराष्ट्र गौरव पुरस्कार

## ११ मार्च रोजी पुण्यात वितरण

अळकुटी : प्रतिनिधी

**अळकुटी येथील उदयोन्मुख निवेदक उत्तम घोलप यांना नुकताच महाराष्ट्र गौरव पुरस्कार जाहिर झाला असून ११ मार्च रोजी पुणे येथे या पुरस्काराचे वितरण होणार आहे. विविध क्षेत्रातील सेलेब्रिटी तसेच बिग बॉस मधील अनेक कलाकारांची यावेळी उपस्थिती असणार आहे.**



आपल्या ओघावत्या शैलीमध्ये निवेदन करत आपली वेगळी ओळख निर्माण करणारे घोलप हे निवेदनाबरोबरच होम मिनिस्टर अर्थात सन्मान स्त्री शक्तीचा, अभिमान महिला वर्गाचा या कार्यक्रमाचेही सादरीकरण करतात. २१ व्या स्पर्धेच्या युगामध्ये प्रत्येक स्त्रीने कसे खंबीरपणे उभे रहावे यासाठी घोलप हे या कार्यक्रमातून प्रबोधन करतात. या कार्यक्रमाच्या माध्यमातून महिला वर्गामध्ये त्यांनी आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम केले आहे.

निवेदन, होम मनिस्टर कार्यक्रमाचे सादरीकरण याबरोबरच घोलप हे सामाजिक कामातही आपले योगदान देत आहेत. त्यांच्या या योगदानाबददल विविध राजकीय नेतेमंडळींकडून त्यांच्या पाठीवर कौतुकाची थापही पडली आहे. घोलप यांनी आजवर सुमारे १ हजार २०० राजकीय तसेच सामाजिक कार्यक्रमांमध्ये निवेदनाची जबाबदारी सक्षमपणे पेलली असून ४५० होम मिनिस्टर कार्यक्रमांचे सादरीकरण केले आहे. पारनेर तालुक्यासह शिरूर, श्रीगोंदे, जुन्नर या तालुक्यांमध्ये त्यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

### सामाजिक, राजकीय क्षेत्रात पसंती

शिक्षण पुर्ण झाल्यानंतर नोकरीसाठी शैक्षणिक पात्रता त्याबरोबरच स्पर्धेचा विचार करता नोकरी मिळेलच याची शास्वती नाही. त्यामुळे आपल्यातील कला गुणांना वाव देत आपल्या रोजीरोटीचे साधन म्हणून आपण या क्षेत्रात पाऊल टाकले. आपल्यावर टाकण्यात आलेली जबाबदारी सक्षमपणे पार पाडल्याने सामाजिक, राजकीय क्षेत्रामधून आपणास पसंती दिली जाते.

**उत्तम घोलप**
निवेदक

### तालुक्यासाठी अभिमानास्पद

उत्तम घोलप हे नावाप्रमाणेच उत्तम निवेदक आहेत. आजवर विविध कार्यक्रमांमध्ये त्यांनी केलेले निवेदन उपास्थितांची वाहवा मिळवून गेले आहे. दिवसेंदिवस आपल्या क्षेत्रात यश संपादन करत असताना युवा महाराष्ट्र राज्य फाउंडेशनच्या वतीने त्यांच्या योगदानाची दखल घेउन त्यांना महाराष्ट्र गौरव पुरस्कार देउन सन्मानीत करण्यात येत आहे ही बाब तालुक्यासाठी अभिमानास्पद आहे.

**खासदार नीलेश लंके**
लोकसभा सदस्य

# पारनेर पब्लिकचा श्रीराज जिल्हयात नंबर वन!

## ऋचा खरमाळे जिल्ह्यात दुसरी | प्रज्ञा शोध परक्षेचा निकाल जाहीर

पारनेर : प्रतिनिधी

**नगर येथील डॉ. हेगडेवार प्रतिष्ठानच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता चौथी व इयत्ता सातवीच्या प्रज्ञाशोध परीक्षेत पारनेर पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. इयत्ता चौथीचा श्रीराज वालझडे याने जिल्हयात पहिला क्रमांक तर इयत्ता सातवीची ऋचा खरमाळे हिने जिल्हयात दुसरा क्रमांक पटकावित विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.**




श्रीराज वालझडे याने २४८ गुण तर ऋचा खरमाळे हिने २२४ गुण मिळवत आपल्या बुध्दीमत्तेची चुणूक दाखविली. इयत्ता चौथीमधील सात तर इयत्ता सातवीचे बारा विद्यार्थी जिल्हा स्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेच्या गुणवत्ता यादीत आल्याचे प्राचार्य गिताराम म्हस्के यांनी सांगितले.

चौथीच्या यशस्वी विद्यार्थ्यांना किसन पुंडे, शरद मापारी, निलोफर मोमीन, अश्विनी कोकाटे, योगिता राउत, हर्षद म्हस्के यांनी तर इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांना सचिन मोढवे, शंभुनाथ रंधवे, वंदना वाघमारे, प्रीती नरसाळे यांचे मार्गदर्शन लाभले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे ज्येष्ठ समाजसेवक अण्णासाहेब हजारे, डांगेज पॅटर्नचे संस्थापक ज्ञानेश डांगे, विद्यालयाचे प्राचार्य गिताराम म्हस्के, संस्थेच्या अध्यक्षा सविता म्हस्के, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यावतीने अभिनंदन करण्यात आले.

### यशस्वी विद्यार्थी

**इयत्ता चौथी**

श्रीराज वालझडे २४८, रिध्दी शिंदे २३६, प्रांजल नरसाळे २२८, पुनीत डुंगरवाल २२४, ईश्वरी डेरे २२४, ईश्वरी दुधाडे २२४,परिधी वाबळे २१६

**इयत्ता सातवी**

ऋचा खरमाळे २२४, वैष्णवी पवार २२४, अर्विता बोरूडे २२२, अथर्व शेळके २१६, कृष्णा पठारे २०२, विराज ढोले, समृध्दी चौधरी १९६, अंशुल हंडोरे १९४, अन्वेषा बोरूडे १९४, पारायणी बेलोटे १९४.


'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com